डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

**कृषि तंत्र विद्यालय, लांजा, जि. रत्नागिरी**

जा.क्र./कृतंविला/प्रक्षेत्र/ ९३ /२०२२ दिनांक:— 12 MAY 2022

## —: जाहीर नोटीस :—

कृषि तंत्र विद्यालय, लांजा यांजकडून या विद्यालयाच्या प्रक्षेत्रावरील व्हरायटी आंबा बागेतील साफ सफाई करणे, शेती विषयक कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी दरपत्रके सोबतच्या प्रपत्रामध्ये मागविणेत येत आहेत. दरपत्रके दि. २३/०५/२०२२ पर्यंत स्वीकारली जातील.

**कामाचा कालावधी दिनांक २५/०५/२०२२ ते १५/०६/२०२२**

**ठेका पध्दतीने कामे करणे संबंधिच्या या कार्यालयाच्या अटी/शर्ती**

| | |
|---|---|
| ❖ | ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर एकूण कामाचे स्वरुप पाहून दरपत्रकामध्ये दर सादर करावेत. |
| ❖ | ठेका मंजूरी आदेश प्राप्त होताच मंजूर पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख/ प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सुचनांनुसार व त्यांचे देखरेखीखाली करावयाचे आहे. |
| ❖ | ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना श्रम व रोजगार मंत्रालय नवी दिल्ली यांचा एफ.नं. १/१३/(१)२०१७—एल एस—११ दिनांक १७.०३.२०१७ च्या अनुषंगाने शासनाच्या किमान वेतन दरानुसार वेतन देण्यात येते, असे प्रमाणपत्र ठेकेदाराचे देयक कार्यालयास सादर करतेवेळी देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देयकासोबत नसल्यास देयकाची अदायगी करण्यात येणार नाही. |
| ❖ | कामाची अदायगी महिना पुर्ण झाल्यावर करण्यात येईल/ठेका संपल्यानंतर करण्यात येईल. संबंधीत देयक सादर करताना विभग प्रमुख/प्रक्षेत्र प्रमुख /प्रक्षेत्र अधिक्षक यांचेकडील कामे वेळेत पूर्ण केलेबाबतचा दाखला देयकासोबत जोडणे बंधनकारक राहिल. |
| ❖ | ठेका अपूर्ण सोडल्यास ठेक्याच्या बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्या वेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच सबंधीत ठेकेदाराचे दरपत्रक/निविदा पुढील ठेक्याच्या वेळी ग्राहय धरले जाणार नाही. |
| ❖ | प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबंधीत कार्यालयामार्फत केला जाईल. पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दररोज संबंधीतांकडे जमा करावयाचे आहे. औजारे नादुरुस्त झाल्यास दुरूस्तीसाठी होणारा खर्च ठेकेदाराच्या देयकामधून वसूल केला जाईल. |
| ❖ | प्रक्षेत्रावर दिलेल्या सुचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकार असेल, सुचनाचा अवमान केल्यास ठेका त्वरित बंध केला जाईल. त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखर घेतली जाणार नाही. |

| | |
|---|---|
| ❖ | ठेकेदाराचे पॅनकार्ड व बँक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी त्याचे बँक खाती एन. ई. एफ. टी. / आर. टि. जी. एस. धनाकर्षव्दारे करण्यात येईल. |
| ❖ | ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्या संबंधीत कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही. |
| ❖ | कामाच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडुन/मजूरंकडुन प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदाराच्या देयकामधून संबंधीत नुकसानीची किंमत वसूल करण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारावर कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल. |
| ❖ | ठेकेदाररामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनाचे काटेकोरपणे पालण करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारासह देण्यात आलेला ठेका कोणत्याही वेळी रदद करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवला आहे. |
| ❖ | सर्वोच्य न्यायालयाने निर्धारित केलेल्या याचिक क्रं एस.एस.पी ५४५३/९० नुसार ठेकेदाराने नेमलेल्या मजूरास/इसमास ठेकाकालावधीमध्ये /ठेका कालावधीनंतर विद्यापीठ/शासकीय सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही. |
| ❖ | या कंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल. त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबत करार लिखीत स्वरूपात करणे बंधनकार राहील. कंपनी/संस्थेसतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्याच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही. |

## कामाचे स्वरूप

१ झाडे तोडणे
२ तोडलेली झाडे मोकळया भागात गोळा करणे
३ तोडलेली झाडे नष्ट करणे

अधिक्षक,
कृषि तंत्र विद्यालय,
लांजा जि. रत्नागिरी

माहितीसाठी व प्रसिध्दीसाठी.............
१) प्रभारी अधिकारी कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली (AKMU)
२) नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
३) ग्रमपंचायत कार्यालय